महाराष्ट्र शासन

# कार्यालय, प्रकल्प अधिकारी

## एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प भामरागड जि.गडचिरोली

कार्यालयीन शासकिय इमारत, आरेवाडा रोड, भामरागड जि. गडचिरोली - 442710

E-mail - pbhamragad@gmail.com / poitdp.bgad-mh@gov.in Website- www.pobhamragad.com

**जा.क्र-भांडार-2025/वस. भोजन/प्र.क्र./का.7(1)/ 4190** | **दिनांक :- 23/07/2025**

### दरपत्रक सुचना

प्रति,

1) कार्यालयाचे नोटीस बोर्ड / Website
2) -------------------------------

**विषय:- शैक्षणिक सत्र 2025-26 करीता आदिवासी मुलांचे शासकीय वसतीगृह भामरागड जि. गडचिरोली येथील वसतीगृहांतील विद्यार्थ्यांना भोजन पुरवठा करणेकरिता दरपत्रक सादर करणेबाबत.**

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, सन 2025-26 या वित्तीय वर्षात प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प भामरागड जि. गडचिरोली यांचे अंर्तगत चालविण्यात येणाऱ्या आदिवासी मुलांचे शासकीय वसतीगृह भामरागड येथील विद्यार्थ्यांना भोजन पुरवठा करणेकरिता ईच्छुक पुरवठाधारकांकडुन खालील प्रमाणे भोजन तपशिलानुसार व अटी शर्तीनुसार **दिनांक 23/07/2025 ते 29/07/2025** पर्यंत दरपत्रके मागविण्यात येत असुन सदर दरपत्रके **दिनांक** 30.07.2025 ला उघडण्यात येणार आहे. करिता ईच्छुकांनी खालीलप्रमाणे सिलबंद लिफाफ्यात दरपत्रक सादर करण्यात यावे.

| अ. क्र. | कामाचे नाव | भोजन तपशिल | प्रति विद्यार्थी प्रति माह दर |
|---|---|---|---|
| 1 | **आदिवासी मुलांचे शासकीय वसतीगृह भामरागड जि. गडचिरोली येथील वसतीगृहांतील विद्यार्थ्यांना पुरवठा करणे.** | 1) शासकीय वसतीगृहातील विद्यार्थ्यांना भोजनात गहु/ बाजरी /ज्वारी / तांदुळ(भात) / दाळ / भाजीपाला / कंदभाज्या इत्यादी वस्तुंचा पुरवठा अमर्यादित (पोटभर) करण्यात यावा.<br>2) विद्यार्थ्यांना सकाळी नाश्त्यासाठी उपमा/ पोहे/ शाबुदाना खिचडी/ शिरा यापैकी एक किमान 100 ग्रॅम , दुध 200 मिली. (15 ग्रॅम साखरेसह), मांसाहारी विद्यार्थ्यांसाठी दररोज एक उकळलेली अंडी व शाकाहारी विद्यार्थ्यांसाठी दररोज 50 ग्रॅम वजनाचा बिस्किट पुडा, दररोज ऋतुमानानुसार उपलब्ध होणारे एक फळ देण्यात यावा.<br>3) मांसाहारी विद्यार्थ्यांसाठी दर रविवारी एकवेळ 200 ग्रॅम मटण अथवा चिकम आलटुन पालटुन देण्यात यावा. सदरचे जेवणासोबत कांदा, लिंबु इत्यादी देण्यात यावे.<br>4) सर्व विद्यार्थ्यांसाठी (शाकाहारी व मांसाहारी) रविवारची एकवेळ फिस्ट सोडुन इतर सर्व वेळी वरण, भात , दोन भाज्या, पोळी, दही देण्यात यावे. शाकाहारी विद्यार्थ्यांना दर रविवारी एकवेळ 150 ग्रॅम स्वीट (गोडपदार्थ) बासुंदी, जिलेबी, बालुशाही, श्रीखंड, गुलाबजाम यापैकी एक नियमित जेवणासोबत देण्यात यावे. सलाद आलटुन पालटुन देण्यात यावा.<br>5) विद्यार्थ्यांना दररोज सकाळ/संध्याकाळ प्रत्येक वेळी जेवणात लोणचे व कांदा देण्यात यावा.<br>6) शासन निर्णय आदिवासी विकास विभाग, दिनांक 11.11.2011, 120.04.2013, 29.06.2013 च्या तरतुदी तसेच शासनाने, वरिष्ठ कार्यालयाने व प्रकल्प कार्यालयाने वेळोवेळी निर्गमित केलेले परिपत्रक / सुचना/आहाराचे प्रमाण लागू राहतील. | |

**अटी व शर्ती**

1. ईच्छुक पुरवठाधारकांनी खालील वसतीगृहांकरीता दरपत्रके सादर करण्यात यावे.
   **1) आदिवासी मुलांचे शासकीय वसतीगृह भामरागड, मंजुर विद्यार्थी क्षमता- 75 विद्यार्थी**
2. वसतीगृहास भोजन पुरवठा हा मा. अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर यांचेकडुन आदेश प्राप्त होऊन भोजन पुरवठा सुरु होईपर्यंत करावयाचा असुन अत्यंत तातपुरत्या स्वरुपाचा आहे.
3. दरपत्रकांसोबत दरपत्रकधारकांनी पुढिल आवश्यक कागदपत्रे जोडण्यात यावी- 1) अन्न व औषध प्रशासन विभागाचे वैध प्रमाणपत्र, 2) जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र, 3) पॅन कार्ड, 4) संस्था किंवा बचत गट असल्यास नोंदणी प्रमाणपत्र, 5) मागील वर्षाचे आयकर प्रमाणपत्र, 6) केंद्रशासन अथवा राज्यशासन यांचे कडून कधीही काळया यादीत टाकण्यात आली याबाबतचे रु. 100/- च्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र.
4. भोजन पुरवठाधारकास स्वयंपाकाची व्यवस्था वसतीगृहाच्या परिसरात स्वतंत्र स्वंपाकगृहामध्ये करावी लागेल.
5. भोजन पुरवठाधारकास अन्नधान्याच्या साठवणुकीकरीता स्वतंत्रपणे एक खोली देण्यात येईल व त्यामध्ये अन्नधान्य व स्वयंपाकाकरिता लागणाऱ्या साहित्याची साठवणुक या खोलीमध्ये करावी.
6. विद्यार्थ्यांचे भोजनाकरीता लागणारे अन्नधान्य व स्वयंपाकाकरीता वापरण्यात येणारे किराणा साहित्य तेल, मसाले, तिखट, हळद इत्यादी तथा वाळलेला मसाला, भाजीपाला अदा. कांदे, लसुन, बटाटे इ. सर्व दिवसांकरीता पुरेसे साहित्य साठवणुकीकरीता दिलेल्या खेलीमध्ये करावी लागेल.
7. स्वयंपाकासाठी किंवा जेवणासाठी सर्व प्रकारची लागणारी सर्व प्रकारची भांडी, गॅस; शेगडी तथा आचारी, मदतनीस, वाढणे इत्यादी व्यवस्थासुध्दा भोजन पुरवठाधारकास करावी लागेल.
8. विद्यार्थ्यांचे स्वयंपाकासाठी पाणी व विद्युत पुरवठा विनामुल्य पुरविण्यात येईल परंतु त्यांचा दुरुपयोग झाल्यास योग्य आकार भोजन पुरवठाधारकाकडुन वसुल करण्यात येईल.
9. भोजन पुरवठाधारकाकडुन भोजन ठेक्या दरम्यान शासकीय मालमत्तेचे कोणतेही नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी लागेल.
10. भोजन पुरवठाधारकाकडुन खरेदी करण्यात आलेल्या अन्नधान्याची प्रत उच्च दर्जाची असावी. तसेच भाजीपाला स्वच्छ व चांगल्या प्रतीचा वापरावा लागेल. स्वंयपाकाकरिता तेल नामांकित कंपनीचे तसेच हळद, मिरची, मसाला, मोहरी, जीरे, मिठ एगमार्क ट्रेडचे वापरावे लागेल.
11. सदोष जेवणामुळे किंवा अस्वच्छतेमुळे दुध, नास्ता व जेवण घेतल्यामुळे विद्यार्थ्यांना विषबाधा उद्‌भवल्यास किंवा जिवितास, आरोग्यास अपाय झाल्यास नुकसानीची जबाबदारी संपुर्णत: भोजन पुरवठाधारकाची राहिल.
12. भोजन पुरवठा संदर्भात संबंधित वसतीगृहाचे गृहपाल यांचेकडुन दररोज सकाळी हजर विद्यार्थ्यांची संख्या पुरवठाधारकास लेखी किंवा तोंडी कळविण्यात येईल त्याप्रमाणे पुरवठाधारकाला तेवढ्याच विद्यार्थ्यांचे सकाळ तथा सायंकाळचे भोजन तयार करावे लागेल व पुरवठाधारकाकडुन देण्यात आलेल्या सकाळ/ सायंकाळ या भोजनाबाबत विद्यार्थ्यांना भोजन दिल्याबाबत रजिस्टरवर स्वाक्षरी घेऊन सदर रजिस्टर संबंधित गृहपाल यांचेकडुन दररोज प्रमाणित करुन घ्यावे लागेल.
13. भोजन समितीने ठरवुन दिलेल्या वेळापत्रकानुसार त्यांचे समक्ष स्वयंपाक करुन तयार करण्यात आलेले भोजन गृहपाल यांचेकडुन तसेच भोजन समितीने चव घेऊन रुचकर असल्यास विद्यार्थ्यांना जेवण वाटप करण्यास बंधनकारक राहिल.
14. भोजन पुरवठाधारकाकडुन तयार करण्यात आलेल्या भोजनाची प्रत गृहपाल तथा भोजन समितीने निकृष्ठ दर्जाचे असल्याचे कारणावरुन तथा रुचकर नसल्याचे कारणावरुन नाकारल्यास ते शासकीय प्रयोगशाळेत तपासणी साठी पाठविण्याचा अधिकार गृहपाल यांना राहतील. त्यावर होणारा खर्च भोजन पुरवठाधारकास द्यावा लागेल. ही रक्कम भोजन पुरवठा देयकातुन वसुल केली जाईल व या परिस्थितीत तात्काळ पणे भोजन पुरवठाधारकास रुचकर व स्वादिष्ट भोजन तयार करुन द्यावे लागेल. तसेच भोजन पुरवठाधारकाने पुरविलेले दुध व भोजन इत्यादी भेसळ युक्त आहे असे निदर्शनास आल्यास व ते सिध्द झाल्यास भेसळ प्रतिबंधक कायदा अन्न व औषधी प्रशासन अंतर्गत होणाऱ्या कार्यवाहीस पात्र राहिल.
15. ठरवुन दिलेल्या वेळेच्या आत भोजन पुरवठाधारकाने भोजन व्यवस्था सुरु न केल्यास लागलेल्या विलंबास भोजन पुरवठाधारक जबाबदार राहिल व त्यासाठी भोजन पुरवठाधारकास कार्यालय ठरवेल तो दंड द्यावा लागेल किंवा भोजन ठेक्याचे आदेश तात्काळ रद्द केल्या जातील.
16. कंत्राट ज्या कालावधीकरीता देण्यात आलेला आहे त्या कालावधीमध्ये कोणत्याही परिस्थितीत पुरवठाधारकाकडुन भोजन पुरवठा बंद करता येणार नाही. तथा एखाद्या दिवशी भोजन पुरवठा मधुनच बंद करणे किंवा पुर्णपणे बंद करणे असे करता येणार नाही.

17. वसतीगृहातील हजर विद्यार्थ्यांना दररोज भोजनाची देयके महिना संपल्यानंतर पुढिल महिन्याच्या 5 तारखेच्या आत गृहपाल यांचकडे सादर करावे लागेल. देयकासोबत गृहपाल कडुन दररोज देण्यात आलेल्या विद्यार्थ्यांची संख्या तसेच तारखेनिहास हजर विद्यार्थ्यांना भोजन दिल्याबाबतचा तपशिल इत्यादी जोडणे अनिवार्य राहिल.सदरचे देयक गृहपाल अटी व शर्ती नुसार तपासुन 03 दिवसाच्या आत कोषागारात सादर करतील.
18. दिर्घकालीन सुट्टया व त्यानंतर सुरु होणाऱ्या व शैक्षणिक संस्था सुरु होणाऱ्या सुट्टयांचे दिवस सोडुन (प्रत्यक्ष जेवण घेतलेल्या दिवसाचे) महिन्याचे ठरलेल्या दराने देय राहिल.
19. विद्यार्थ्यांचे अनुपस्थितीची आगाऊ सुचना दिलेल्या दिवसाचे बिल देय राहणार नाही.
20. शाळेतील विद्यार्थ्यांव्यतिरिक्त बाहेरचे कोणास भोजन दिल्यास त्याची देयके देय राहणार नाही.
21. शाळेतील भोजन पुरवठा विषयी प्रवेशित विद्यार्थ्यांच्या तक्रारी येणार नाही व शासन निर्णयात नमुद आहार प्रणालीनुसार भोजनाचा दैनिक पुरवठा काटेकोर पणे करावा लागेल.
22. सदरचा आदेश शैक्षणिक सत्र संपुष्ठात आल्यानंतरही व नविन शैक्षणिक सत्रातील करार अस्तित्वात येण्यास काही अपरिहार्य कारणास्तव विलंब झाल्यास त्या दरम्यानच्या काळात सद्याचे मंजुर दराने पुरवठा आदेशातील अटी व शर्तीनुसार भोजन पुरवठा चालु ठेवावा लागेल.
23. पुरवठाधारकास काही कारणास्तव करार रद्द करावयाचा असल्यास किंवा भोजन पुरवठा बंद करावयाचा असल्यास किमान 30 दिवासाच्या अगोदर लेखी सुचना प्रकल्प अधिकारी, ए. आ. वि. प्र. भामरागड जि. गडचिरोली यांना द्यावी लागेल परंतु लेखी सुचनेची कारण प्रकल्प अधिकारी यांना संयुक्तीक वाटत नसले तर कंत्राट रद्द होणार नाही. खोटे कारण सादर केल्यास कायदेशीर कार्यवाही केली जाईल व अनामत रक्कम जप्त केल्या जाईल.
24. भोजन पुरवठाधारकाच्या एकुण देयकातुन नियमानुसार कर कपात करण्यात येईल.
25. भोजनातील तोच-तो पणा टाळण्यासाठी भोजनात नेहमी बदल करावा.
26. दोन पेक्षा अधिक दरपत्रक धारकाचे न्युनतम दर समसमान प्राप्त झाल्यास पुरवठा धारकाचा अनुभव व क्षमता यांचा विचार करुन निवड करणात येईल. निवडीचा अंतिम अधिकार निविदा समितीला राहिल.
27. **आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय 11.11.2011 व शुध्दीपत्रक शासन निर्णय 10.04.2013, 29.06.2013 मधील दिलेले भोजन मेनु व प्रमाणानुसार भोजन पुरवठा करणे निविदाधारकास बंधनकारक राहील.**
28. **वसतीगृह भोजन पुरवठा बाबत वरिष्ठ कार्यालयाकडुन भोजन पुरवठ्याबाबत आदेश प्राप्त झाल्यास तसेच शासनाकडुन / वरीष्ठ कार्यालयाकडुन DBT बाबत निर्णय घेण्यात आल्यास सदर प्रक्रिया किंवा आदेश कोणत्याही टप्पावर रद्द करण्यात येईल.**
29. वसतीगृहात प्रवेशित होऊन निवासी राहणाऱ्या कमीत कमी विद्यार्थ्यांना देखील मंजुर दराने भोजन पुरवठा करावा लागेल. त्याकरिता वाढीव रकमेची मागणी करता येणार नाही.
30. भोजन पुरवठाधारकाने विद्यार्थी संख्या कमी असल्याच्या कारणाने भोजन पुरवठा करण्यास नकार दिल्यास अशा पुरवठादाराला काळ्या यादीत समाविष्ठ करण्यात येईल तसेच त्यानंतर अशा पुरवठाधारकास विभागाच्या कोणत्याही निविदेत भाग घेता येणार नाही याची नोंद घ्यावी.
31. संसर्गजन्य रोग किंवा इतर विषाणुंचा प्रादुर्भाव रोखण्यासंदर्भात केंद्र शासन व राज्य शासन यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या सर्व सुचनांचे व निर्देशांचे पालन भोजन पुरवठाधारकास करणे बंधनकारक आहे.
32. भोजन तयार करण्याकरिता वसतीगृहात आणण्यात येणारी सामुग्री तसेच कर्मचारी वर्ग यापासुन वसतीगृहामध्ये संसर्गजन्य रोग किंवा इतर विषाणुंचा प्रसार होणार नाही याची विशेष खबरदारी घेण्यात यावी.
33. भोजन तयार करण्याकरिता कार्यरत कर्मचारी वर्गाची आवश्यकता भासल्यास वेळोवेळी संसर्गजन्य रोग किंवा इतर विषाणुंची चाचणी करणे पुरवठाधारकास बंधनकारक आहे.

Namag

(नमन गोयल, भा.प्र.से.)
प्रकल्प अधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
भामरागड जि. गडचिरोली

**प्रत**:- गृहपाल, आदिवासी मुलांचे / मुलींचे शासकीय वसतीगृह भामरागड/ एटापल्ली:- आपणास सुचित करण्यात येते की, सदर सुचना आपल्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात येऊन जास्तीत जास्त ईच्छूक भोजन पुरवठाधारक यांस सुचना देण्यात यावी.